The South Asian Academic Research Chronicle ISSN 2454-1109

A Refereed Interdisciplinary Indexed International Open Access Monthly e-Journal

Vol 11.Issue1 & 2; Jan-Feb 2024

# संत सर्वज्ञ दासोपंतांचा वाड्.मयार्णव– धर्ममूल्य आणि कलामूल्यांचा भक्तिपूर्ण समसमा संयोग

**डॉ. सो. वैशाली गोस्वामी-कुलकर्णी**
जुना कौठा, नांदेड जि. नांदेड

संत सर्वज्ञ दासोपंत 15 - 16 व्या शतकातले ! मध्ययुगांतील नाथपंचक म्हणजे संत एकनाथ, जनीजनार्दन (बीड), रामा जनार्दन, विठा रेणुकानंदन आणि संत सर्वज्ञ दासोपंत हे होय.

या पंचकातीलच नव्हे तर एकूणच आजवरच्या संत वाड्.मयात सर्वाधिक , प्रचंड वाड्.मय निर्मिती करणारे संत म्हणजे सर्वज्ञ दासोपंत होत. त्यांनी केवळ अफाट साहित्य निर्माण केले, असे नाही तर त्यातील वैविध्य, वैचित्र्य , विलक्षणता यामुळे त्यांचे साहित्य संत वाड्.मयात आपली विशिष्टता सिद्ध करते हे निश्चित. ज्यांनी अंबाजोगाईत मंदिर परंपरेत धर्मसंप्रदायी उपासनेला कलात्मक अधिष्ठान दिले, ते संत सर्वज्ञ दासोपंत गोस्वामी होत.

**संत दासोपंतांचे चरित्र :-** बेदर परगण्यातील नारायण पेठी दिगंबरपंत हे बेरिद अलीच्या दरबारात कमाविसदार होते. दिगंबरपंताकडे पंचमहाली देशमुखी- देशपांडेपण होतं. दिगंबरपंत व पार्वतीबाईच्या पोटी मोठया नवसानं अधिक भाद्रपद वद्य अष्टमीला 'दासो' चा जन्म झाला बालपणापासूनच अत्यंत हुशार असलेल्या दासोनं वयाच्या 5 व्या वर्षी, मौंज होताच चारही वेद मुखोद्गत म्हणून दाखविले ! पुढे वयाच्या 16 व्या वर्षी गद्वालच्या सावकाराच्या मुलीशी जानकीशी त्यांचा विवाह झाला.

राज्यात दुष्काळ पडला लोकांची अन्नान्न दशा झाली आणि दिगंबरपतंताच्या ठायी असलेली भूतदया जागी झाली. त्यांनी कोठारातील सर्व धान्य गोरगरीब लोकांना वाटून टाकले. त्यावर्षी दिगंबरपंतांनी 'सारा' ही जमा करुन भरला नाही. बादशहाला ही गोष्ट कळताच दिगंबरपंतांना दरबारात हजर राहण्याचे आदेश दिले. दिगंबरपंत आपल्या लवा-जम्यासह हजर झाले. सोबत 'दासो' होता. बादशहाने कोठार खुली करण्याबददल जाब विचारला दिगंबरपंतांचे 'मला गरिबांची दया आली' हे उत्तर ऐकून बादशहा आणखीनच संतापला. त्यानं फर्मान सोडल. 'एक महिन्याच्या आत दोन लक्ष सुवर्णमुद्रा सरकारी खजिन्यात जमा करा. तोवर 'दासो' ला इथं ओलीस म्हणून नजरकैदेत रहावं लागेल. एक महिन्याच्या आत मुद्रा भरल्या नाहीत तर दासो ला मुसलमान केले जाईल'. हे निर्वाणीचे शब्द ऐकले आणि दिगंबरपंतावर आभाळच कोसळलं ! त्यांची चूक त्यांना मान्य होती पण त्याची एवढी मोठी शिक्षा भोगावी लागेल अशी कल्पनाही त्यांनी केली नव्हती ! आपला नुकताच लग्न झालेला कोवळा पोरगा आपण आपल्या हाताने कसायाच्या ताब्यात दिला असं त्यांना वाटू लागलं पण आता कांहीच इलाज नव्हता. दिगंबरपंत खालमानेनं घरी आले. पार्वतीबाईना ही गोष्ट कळली आणि त्यांनी धीरच सोडला ! नुकतीच लग्न होवून आलेली जानकी तर अजाणच होती ! ती भांबावून गेली.

एवढी मोठी रक्कम दिगंबरपंतांना भरणं कदापि ही शक्य नव्हत !

'दासो' बादशहाच्या नजरकैदेत होता. तो रोज झरणीनृसिंहाला जाई, तिथे स्नान- संध्या आदि अन्हिके करी बादशहाने भोजन खर्चासाठी म्हणून दिलेले पैसे ब्राम्हणांना दान करी आणि परत येई. त्याच्या कोवळया वयातील गंभीरमुद्रेकडे पाहून लोक हळहळ करीत. आता हा तेजस्वी ब्राम्हण मुलगा 'मुसलमान' होणार याचे दु:ख ही त्यांना होत असे. पण बादशहाच्या आज्ञेपुढे कांहीच चालत नव्हते !

एक महिना भरत आला आज शेवटचा दिवस ! इकडे दासोने आणि तिकडे दिगंबरपंतांनी- पार्वतीबाईंनी तर आशाच सोडून दिली होती !

दासो आपल्या सात पिढयांपासून असलेल्या कुलदैवताला, 'श्रीदत्तात्रेयाला' आर्त टाहो फोडून आळवित होता आणि दिवसाच्या शेवटच्या प्रहरी सूर्य मावळताना हातात काठी, डोक्यावर मुंडासं, खांद्यावर घोंगडी अशा वेषातील 'दत्ताजी पाडेवार' बादशहापुढं हजर झाला. 'मी दिगंबरपंतांचा सात पिढयांपासून सेवक आहे माझं नाव दत्ताजी पाडेवार. मला दिगंबरपंतांनी या मुद्रा देवून पाठवलं आहे'. असे म्हणून त्यान हातातली दोन लक्ष मुद्रा असलेली चंची बादशहाच्या पुढयात खळाखळा ओतली. मुद्रा मिळाल्याची पावती मागितली आणि पावती घेवून तो गेला सुद्धा ! ही गोष्ट दासोला कळली आणि त्याच्या डोक्यात लख्ख प्रकाश पडला. आपण 'श्रीदत्तात्रेयाच्या' दर्शनाला मुकलो हे त्याच्या ध्यानांत आलं. बादशहा मात्र भाग्यवान त्याला श्रीदत्ताचं दर्शन झालं ! असं त्याला वाटलं.

बादशहाने दासोची पालखीतून पाठवणी केली लोकांत 'आनंदीआनंद' झाला. दिगंबरपंत व पार्वतीबाई आनंदानं हरखून गेले. पण आनंदोत्सवात ही वरवर आनंदी दिसणारा 'दासो' मात्र अस्वस्थ होता. हा 'दत्ताजी पाडेवार' म्हणजे प्रत्यक्ष श्रीदत्तात्रेयच ! श्रीदत्तात्रेयच्या दर्शनाचा ध्यास लागला आणि घरी आल्यानंतर कांही दिवसातच घर-संसाराचा त्याग करुन 'दासो' घराबाहेर पडला. कांही काळ भ्रमणानंतर तो माहूरगडी 12 वर्षे तप:श्चर्या करुन त्यांनी ज्ञान योग सिद्ध आणि साध्य केला.

पती घरातून निघून जावून 12 वर्षे होवून गेल्यामुळे दिगंबरपंत पार्वतीबाई जानकीला वैधव्य पत्करण्यासाठीच्या विधीसाठी वाणीसंगमावर घेवून आले. तिथेच व्याघ्रेश्वराच्या मंदिरात 'दासोपंत' बसलेले होते. त्यांनी या मंडळीना ओळखले आणि 'हे कृत्य तूर्तास थांबवावे' असा निरोप दिला. हा निरोप कोणी दिला त्यांची भेट घ्यावी, दर्शन घ्यावे म्हणून ही सर्व मंडळी व्याघ्रेश्वराच्या मंदिरात आली आणि जानकीने तात्काळ आपल्या पतीस ओळखले. सर्वांची पुन:श्च भेट झाली. दिगंबरपंतानी नारायणपेठी असलेली जहागिरी आपल्या कारभा-याच्या नांवे करुन दिली पुन्हा नारायणपेठी न जाण्यासाठी ! दासोपंत सर्वांसह अंबाजोगाईस आले. गावाच्या मध्यवस्तीत असलेल्या (भटगल्ली) गणपती मंदिरात मुक्काम ठोकला. सितोपंत हे गावातलं बडं प्रस्थ ! त्यांची स्वारी पालखीतून देवीच्या दर्शनासाठी निघाली. त्यांच एक पण होता की, 'मला नजरेने जो समाधी लावील, त्यालाच मी 'गुरू' करीन' दासोपंतांची आणि सितोपंतांची नजरानजर झाली मात्र सितोपंतांची शुद्ध हरपली. सितोपंत शुद्धीवर आले तेंव्हा त्यांचे मस्तक दासोपंतांच्या चरणावर होते.

सितोपंतांनी दासोपंतांची राहण्याची सर्व व्यवस्था लावली. आजचे 'धाकटे देवघर' म्हणजे दासोपंतांचे वास्तव्य असलेले घर होय. दासोपंत नित्यकर्मे, आन्हिके आटोपत आणि अव्याहत लेखन करीत. साधारणपणे वयाच्या 35-40 व्या वर्षी ते अंबाजोगाईस स्थिरावले. यावेळी त्यांनी लेखनास

सुरुवात केली असे गृहीत धरल्यास त्यांनी वयाच्या 64 व्या वर्षापर्यंत म्हणजे 20 ते 25 वर्षे अखंड लेखन केले. त्यांना एक ढबुभर पैशाची शाई लागे असे सांगतात.

माघ वद्य षष्ठी शके 1537 ला ते समाधिस्त होवून श्रीदत्तस्वरुपांत विलीन झाले.

**दासोपंतांचा वाड्.मयार्णव :-**

संत सर्वज्ञ दासोपंतांनी 100 ग्रंथ लिहिले अशी माहिती मौखिक परंपरा देते तर दासोपंतांच्या 50 ते 52 ग्रंथांची सूची आज पहावयास मिळते. त्यातील अगदी बोटावर मोजण्याइतक्याच वाड्.मयकृती संशोधकांस पाहावयास मिळतात.

पासोडी, गीतार्णव, पदार्णव, ग्रंथराज, दत्तमाहात्म्य (संस्कृत व प्राकृत), गातार्थबोधचंद्रिका, वाक्यवृत्ती, प्रबोधोदय, अनेक स्तोत्रे, अष्टके इ. विविध ग्रंथ दासोपंतांनी लिहिले वाड्.मयनिर्मिती या कलेत पारंगत असलेल्या दासोपंतांचा दत्तभक्ती हाच वांड्.मय निर्मितीचा मुख्य विषय होता. परंतु तत्त्वज्ञ दासोपंत भाष्यग्रंथातून तर्ककठोर, तर्कनिष्ठ, तर्कसंगत बुद्धि प्रामाण्यवादी विवेचन करतात तर 'पदार्णवातील' दासोपंत अत्यंत तरल मृदूमृदूल हळव्या मनाचे, भावविभोर झालेले दिसतात. गीतेवर सव्वालक्ष ओव्यांची टीका म्हणजे 'गीतार्णव' 'गीतार्थबोधचंद्रीका' ही संक्षिप्त (8889 ओव्यांची ) टीका लिहीली. 'मागा गीतार्णव रचिले ते समुद्रचि होउनि ठले' ! असे स्वत: दासोपंत गीतार्थबोधचंद्रिकेच्या निर्मितीचे कारण सांगताना म्हणतात.

'ग्रंथराज' हा गुरु-शि ष्य संवादी ग्रंथ सांप्रदायिकाने वाचलाच पाहिजे असा आहे. याच ग्रंथावरुन समर्थ रामदासांनी 'दासबोध' लिहीला. 'पदार्णव' हा सव्वालक्ष पदांचा 'अर्णवच' ! यांत अनेक रत्ने, हिरे, मोती मिळतात. आज मित्तीस 2 ते 2500 पदेच उपलब्ध असून ती एकूण पदरचनांच्या 2 टक्के एवढीच आहे त्यात विविध भाषांतील पदे आढळतात त्यात संस्कृत, प्राकृत, हिंदी ( हिंदुस्थानी ) च्या अनेक छटा, ब्रज, सिधुक्खडी, नाथपंथीय, उर्दू-फार्सी मिश्रित, कन्नड इ. भाषांतून पदरचना आहेत. पदार्णवातील पदे विविध विषयांनी नटलेली आहेत. म्हणजे श्रीदत्त पदांचा आत्मा असून तो प्रियकर, बाप, माय, बंधु, सखा, गुरु, सर्वकांही या कल्पनाबंधाने इच्छानुगामी भावनेचा परिपोष साधणा-या अनेक रचना नाटय, नृत्य, संगीत यांच्या आधाराने बहरलेल्या दिसतात. विविध भावानुभाव व्यक्त करणा-या या रचनांत विरहिण्याची रचना विलक्षण वाटते. दत्तसंप्रदायात 'विरहिण्यांची' रचना करणारी श्रीदत्ताची पहिली प्रेयसी म्हणजे 'दासोपंत' होत विविध पदांतून शुद्ध भक्ति भाव , वत्सलभाव, प्रीतीभाव, (मधुराभाव), क्षमापराधभाव इ. भाव-भावना व्यक्त होतात. सगुण-निर्गुण वर्णन, तत्व चिंतन, अध्यात्म हे विषय तर आहेतच. जनापवाद व जनसंवाद करणारी, शैव-वैष्णव ऐक्यविचार मांडणारी, दंभस्फोट करणारी विपूल पदे दासोपंतांनी लिहिली आहेत. या सर्वांचे प्रयोजन 'सामान्य लोकां'साठीच होते हे लक्षात येते.

**दासोपंतांची पासोडी :-** जगाच्या पाठीवर दासोपंतांच्या पासोडी सारखी कलाकृती नाही असे तज्ज्ञांचे मत आहे. दासोपंतांनी 40 फूट लांब व 4 फूट रुंद अशा पासोडीवर (एक प्रकारचे कापड) 'पंचीकरण' हा अध्यात्मविषय प्रतिपादन केला आहे. आत्मज्ञानासारखा विषय चित्रमय पद्धतीने सुकर, सुबोध रीतीने अमीट अशा पासोडीवर मांडला आहे. अश्वत्थवृक्ष, एकमुखी षडभुजधारी दत्तमूर्ती, शंख,

चक्र, माला, कमंडलू, त्रिशूल, हंस, जीवचक्र इ. चित्राकृतीतून ओवीबद्ध मजकूर लिहिलेला आढळतो. चित्रांतून त्याचा कार्यकारण भाव स्पष्ट करणारा हा मजकूर आहे. अगोदर ओव्या तयार करून त्यानुसार चित्रे रेखाटली की आधी चित्रे रेखाटून त्यानुसार ओव्या लिहिल्या असतील हे ठरवणे बुद्धीवंतांच्या बुद्धील आव्हान आहे.

रेखाचित्रांतून रंगांचा वापर केलेला दिसतो. अत्यंत सुबक उठावदार आणि जिवंतपणा असलेली रेषांची वळणे असलेली ही सुंदर रेखाचित्रे दासोपंत 'चित्रकार' होते हे सांगतात. 'पासोडी' म्हणजे 'चित्रवाङ्.मय', 'चित्रकला' आणि 'वाङ्.मयकला' या दोन कलांचा सुरेख संगम म्हणता येईल. वाङ्.मय कलाकार म्हणून दासोपंतांनी 'पासोडी' सारखे अभिनव माध्यम वापरले व ज्या माध्यमातून व्यक्त करायचे त्यावर वापरली जाणारी चित्र-वाङ्.मय पद्धती ही अभिनवच म्हणावी लागते. दासोपंतांनी अध्यात्मज्ञान सांगितले तेही कलात्मक पद्धतीने. दासोपंतांनी साहित्य शारदेला अर्पण केलेल्या पैठणीरुपी 'पासोडी' ची निर्मिती अंबाजोगाईच्या दत्त मंदिरात, 'धाकटे देवघरी' झाली हे ध्यानात घेणे गरजेचे आहे.

अशा प्रकारची कलाकृती निर्माण होण्यास अंबाजोगईतील सांस्कृतिक क्षेत्रातील उच्च अभिरुची व तेवढयाच उंचीचा कलाकार या दोघांची गाठ पडली हे खरे !

**दासोपंतांची दक्ष संप्रदायी दत्तोपसाना :-** दासोपंतांच्या संप्रदायात एकमुखी षडभुजधारी दत्तमूर्ती, आदि गुरु मूर्ती, दत्तात्रेयाच्या पादुका यांची पूजा 400 वर्षापासून आजवर एका वैशिष्टयपूर्ण होते. दत्तमहात्म्यात दासोपंतांनी श्रीदत्ताचे जे 16 अवतार वर्णिले त्यांच्या 16 जयंत्या साज-या केल्या जातात. मार्गशीर्ष शुद्ध षष्ठीला दत्तात्रेयाच्या नवरात्रास आरंभ होतो व मार्गशीर्ष पौर्णिमेला या नवरात्राची सांगता होते. 9 दिवस अभिषेक षोडषोपचार पूजा, वैदिक पूजा दासोपंतकृत पदगायन पद्धती यासह कीर्तन, प्रवचन, मंत्रघोष, मंत्रानुष्ठान व "आनंदे दत्तात्रेय देव देव सर्वज्ञ दासोपंत स्वामी महाराज की जय !" या नामघोषाची गर्जना अखंड कानी पडते.

या संप्रदायात यंत्रपूजेसही तितकेच महत्त्व आहे. श्रीदत्तात्रेयाची बीजमंत्राक्षरे ताम्रपटावर कोरलेली असून 16 पाकळयांचे षोडषदलयंत्र (वर्तुळाकार) हे अवतारयंत्र तसेच अत्रिपंचक व आदि गुरुयंत्र ( चौरस) यांची पूजा मंत्रानुष्ठाने होते.

एकादशी ते पौर्णिमा वाडयातच देवघराभोवती श्रीदत्तात्रेयाच्या पालखीची मिरवणूक काढली जाते. या मिरवणूकी दरम्यान दासोपंत लिखित 'मिरवणुकीच्या पदांचे' गायन केले जाते. चतुर्दशी व पौर्णिमा हे दोन दिवस जन्मसोहळा संपन्न होतो. पौर्णिमेच्या जन्मानंतर श्रीदत्तमूर्ती समोर, मोठ मोठया ओस-याच्या खाली असलेल्या रंगपीठावर दासोपंतकृत लळित हा लोकनाटयाच्या अंगाने आविष्कृत होणारा कलाप्रकार सादर केला जातो.

**लळित :-** 'लळितांतून' त्यांनी विविध रुपके आविष्कृत केली. उदा :- गोंधळ, जोगवा, भुत्या, दिवटया, गौळण, मुंढे, हिजडे, गारुड, सुकाळशेटी, बैरागी, बैरागन, जोगी, जोगन, बाळसंतोष, वासुदेव, पीर-फकीर, मामी इ. यांत लोकसंस्कृतीच्या उपासकांवर आधारित लळित पदे, पंथोपंथाच्या उपासना मार्गाच्या साधकांवर आधारित लळितपदे, खेळिया धाटणीची लळितपदे, कर्म-विधींवर आधारित

ललितपदे, विविध व्यावसायिकांवर आधारित ललितपदे, कौटुंबिक नातेसंबंधावर आधारित ललितपदे, कूट, नवल, कोडे इ. समावेश होते.

ललितपदांच्या मध्ये घेतली जाणारी संपादणी ही ऐनवेळी व सहज उत्स्फूत अशा प्रकारची असते. संपादणीचे विषय हे त्या त्या काळातील परिस्थीतीनूसार सामाजिक धार्मीक, राजकीय अशा प्रकारचे असावेत असे वाटते.

देवघरांच्या रंगपीठावर अभिव्यक्त होणारी ही सोंगे बहुजनांपासून अभिजनांपर्यंत सर्वांचे मनोरंजन करणारी व प्रबोधन करणारी आहेत. 400 वर्षांपूर्वी देवघरी रंगपीठावरुन 'नाटक' सादर झाले ते संगीतनाटक स्वरुपात होते.

**संगीत :-** दासोपंतांच्या दक्ष संप्रदायी उपासना परंपरेत पदसंगीताला अनन्य साधारण महत्त्व आहे. त्यांचा 'पदार्णव' म्हणजे 'संगीत-नाटय-नृत्य' यांचा कल्लोळच जणू ! 'पदार्णवातील' पदांना दासोपंतांच्या संगीताचा आधार आहे. अभिजात, उपशास्त्रीय व सुगम संगीताच्या अंगाने जाणा-या या रचना आहेत. अभिजात संगीतावर आधारित रचनांमध्ये रागाधारित विविध पदरचना, प्रबंध, चतुरंग प्रबंध, चौताला प्रबंध, जति , रागमाला, रागवेळा, विलंबित तालातील रचना यांचा समावेश आहे. एकूण 86 रागांचा व 11 तालांचा उल्लेख उपलब्ध पदार्णवातील पदांवर आढळतो. संगीतकलेचा संक्रमणावस्थेचा हा काळ असल्याने व दासोपंतांनी दक्षिणेतून उत्तरेपर्यंत भ्रमण केल्याने त्यांच्या पदसंगीतात उत्तरहिंदुस्थानी व दक्षिणहिंदुस्थानी संगीत या दोन्ही संगीताचे गुणमेलन झालेले दिसते. मुसलमानी संगीताचा प्रभाव असलेल्या 'हुसैनी' राग आणि सोवळया, कर्नाटकी संगीतातील 'शंकराभरणम्' राग यावरून दासोपंतांनी केवळ कर्नाटकी संगीताचा वापर केला नाही, हे स्पष्ट होते. गायकाने हाताने टाळी देतांना हात हवेत करण्याची पद्धत उत्तरहिंदुस्थानी तर पदांतील बंद आलापीची पद्धत दक्षिणी अशा विविध गोष्टींचा अभ्यास मांडल्यास दासोपंतांचे सांगीतिक कार्य ख-या अर्थाने स्पष्ट होईल. परंतु मध्ययुगीन संगीत शास्त्राच्या ग्रथातून तानसेन च्या दरबारी संगीताचा उल्लेख येतो पण त्याच काळांतील दासोपंतांच्या मंदिर परंपरेतील प्रबंध गायकीचा उल्लेख आढळत नाही, हे दुर्दैव आहे ! शास्त्रीय, उपशास्त्रीय संगीतावर आधारित विपूल रचना आहेत. तसेच विपुल सुगम रचनांचाही आढळ होतो.

एकूणच 400 वर्षांपूर्वीचे दासोपंतांची मंदिर परंपरेतील संगीतउपासना म्हणजे मराठवाडयातील अंबाजोगाईच्या देवघरच्या रंगपीठावरील अमूल्य असे सांगितिक कार्य होय.

एकूणच दासोपंतांचा हा दक्ष संप्रदाय म्हणजे भगवतभक्तीचा ललित कलाविष्कार होय. आध्यात्मिक, तात्त्विक बैठक असूनही गीत-संगीत- नृत्य -वाड्.मय- चित्र - शिल्प या ललित कलांच्या अंगाने झालेली दत्तसंप्रदायाची उभारणी विलक्षण अभिनव व वैशिष्टयपूर्ण ठरते. मौखिक परंपरेने 400 वर्षापूर्वीच्या अभिजात संगीताचा जिवंत स्त्रोत आजही दासोपंतांच्या दोन्ही देवघरी पाहावयास मिळतो. त्यांच्या 'धाकटे देवघर' व 'थोरले देवघर' या दोन्ही देवघरी नित्य नैमित्तिक पूजा अर्चना तसेच अवतार जयंत्योत्सव व मार्गशीर्ष नवरात्र उत्सव सर्व दासोपंतांचे वंशज 'गोस्वामी' व शिष्यगण मिळून साजरा करतात.

दासोपंतांच्या दक्ष संप्रदायातील पदगायन उपासना परंपरा विशेष महत्त्वाची आहे. या 'पदांचे गायन' व 'लळितांचे सादरीकरण' 'संत सर्वज्ञ दासो दिगंबर सेवाभावी प्रतिष्ठान' च्या वतीने आम्ही करतो. मध्ययुगीन काळांतील दासोपंतांचे पदसंगीत आजही संगीताचा जिवंत सांस्कृतिक स्त्रोत आहे.

सर्वज्ञ दासोपंतांचे व्यक्तिमत्व हे बहुआयामी आणि व्यमिश्र स्वरुपाचे होते व या सकलकलागुणनिधी व्यक्तिमत्वातूनच अंबाजोगाईतील दक्ष संप्रदायातील उपासना पद्धती ललितकलामय झाली. अंबाजोगईतील दासोपंतांचे 'देवघर' हे साहित्य - संगीत- चित्र या कलांचे स्त्रोत ठरते. कलांचे संपन्न आणि समृद्ध सांस्कृतिक केंद्र म्हणजे मराठवाडयातील अंबाजोगाई होय.

बीड जिल्हयातील अंबाजोगाई येथील या संत कलावंताने एक धर्मसंप्रदायी कलापीठ समृद्ध व संपन्न केले. पासोडीतून 'चित्रांतून वाङ्मय' मांडणी ही अभिनव कल्पना व अभिनव असे 'पासोडीचे' माध्यम ही गोष्ट लक्षणीय ठरते; तर संप्रदायातील उपासना परंपरेत पदसंगीताचे, कीर्तनाचे तसेच नाटय, नृत्यासह 'लळितां'चे अनन्य साधारण महत्त्व, यावरून हे व्यासपीठ, रंगपीठ व लोकपीठ यांचे उत्तम सम्मेलन ठरते. लोकांना ललित कलांच्या जाणिवेखातर व मनोरंजनातून शिक्षण या हेतूने ललित कलामयी 'उपासना' करणारा हा संत कलावंत होय. अभिजन व बहुजन यांत कलासेतू बांधणारे संत दासोपंत होत.

400 वर्षापूर्वी ललित कलांच्या माध्यमातून दक्ष संप्रदायी वाङ्मयाच्या आधारे लोकशिक्षण, लोकजागरण व लोकरंजन करणारा हा संत एक थोर कवी, चित्रकार, उत्तम साहित्यिक, कीर्तनकार नाटककार, रंगकर्मी, वाग्गेयकार, बहुभाषिक, बहुग्रंथ प्रसविता, संत पुरुषोत्तम, समाजशिक्षक, सकलकलागुणनिधी अभिजात संत कलावंत होता. या सर्वांत राहून कशातही न राहता 'अहं ब्रम्हास्मि' हे अद्‌वैत तत्त्व जाणणारा; या तत्त्वाशी एकरुप होणारा सकलकलागुणनिधी समाजशिक्षक, योगी, सिद्ध-साधक, सर्वज्ञ !

परंपरा दासोपंतांना श्रीदत्ताचा 17 वा सर्वज्ञावतार मानते !

मराठी वाङ्मय शारदेच्या दरबारात तसेच महाराष्ट्राच्या सांस्कृतिक परंपरेत संगीत-नृत्य -नाटय-साहित्य- चित्रकलेच्या प्रांतात दासोपंतांचे योगदान व भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरते !

**॥ आनंदे दत्तात्रेय देव देव सर्वज्ञ दासोपंत स्वामी महाराज की जय ॥**

संदर्भ :-

1. दासोपंतांच्या पदरचनांचा सर्वांगीण अभ्यास- डॉ. वैशाली गोस्वामी यांचा डॉ.बा.आं.म.वि. मध्ये मराठी विभागात सन 2010 मध्ये सादर प्रबंध.(मार्ग. डॉ.विद्यासागर पाटगंणकर)
2. ओवी ते लावणी- डॉ.श्री. रं. कुलकर्णी.
3. लोकरंगभूमी- डॉ. प्रभाकर मांडे.
4. संगीत विषारद- ले. वसंत.
5. प्राचीन गीत भांडार- डॉ. ना. ग. जोशी.
6. भारूड वाङ्मयातील तत्वज्ञान - डॉ. रामचंद्र देखणे
7. प्रस्तुत शोधनिबंध लेखिका ही संत सर्वज्ञ दासोपंत गोस्वामींच्या 16 व्या पिढीतील मुलगी आहे.